# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 31.03.2026** **वार- मंगळवार**

---

**महावीर जयंती**

भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त आज पुणे शहर आणि परिसरात विविध ठिकाणी शोभायात्रा काढण्यात येत असून इतर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. श्री जैन सामुदायिक उत्सव समिती, पुणेच्या वतीनं जैन श्वेतांबर मूर्तिपूजक संघ, वर्धमान श्र्वेतांबर स्थानकवासी जैन श्रावक संघ, जैन श्र्वेतांबर तेरापंथी सभा, दिगंबर जैन समाज तसंच अन्य स्थानिक संस्थांच्या सहकार्यानं शोभायात्रा काढण्यात आली. सकाळी साडेसात वाजता गुरुवार पेठेतील श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिर येथून भगवान महावीर यांचा जयघोष करीत शोभायात्रेला सुरुवात झाली. शोभा यात्रेत पुण्यातील जैन मंदिरांचे एकंदर २० रथ सहभागी झाले होते. त्यामध्ये भगवान महावीर यांच्या जीवनावर आधारित विविध आकर्षक देखावे मांडण्यात आले होते. ही शोभायात्रा विविध भागांतून जात असताना ठिकठिकाणी तिचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. आदिनाथ स्थानक इथं दुपारी शोभायात्रेची सांगता झाली.

**थकीत एफआरपी**

यंदाचा 2025-26 चा ऊस गाळप हंगाम आता जवळपास संपला असून मोजकेच 10 ते 12 कारखाने अद्याप सुरु आहेत. तरीसुध्दा साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांच्या एफआरपीची सुमारे 4 हजार 898 कोटी रुपयांची रक्कम थकीत आहे. शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जांची परतफेड करण्यासाठी बँकांची 31 मार्च ही अखेरची तारीख आहे. कारखान्यांनी संपूर्ण रक्कम न दिल्यामुळे विशेषतः ऊस उत्पादक शेतकऱ्यांचं पीक कर्ज थकीत राहण्याची दाट शक्यता असून साखर आयुक्तालयानं संबंधित कारखान्यांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. एफआरपीची रक्कम वेळेत देणं कारखान्यांना बंधनकारक आहे. पुढील आठवड्यात थकीत एफआरपीचा पुन्हा आढावा घेऊन संबंधितांच्या सुनावण्या होतील आणि त्यानंतर पुढील कारवाईची भुमिका ठरवली जाईल असं पुणे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी सांगितलं.

**आपली पीएमपीएमएल' क्यूआर कोड**

पीएमपी प्रशासनानं 'आपली पीएमपीएमएल' या ॲपच्या वापरकर्त्यांची संख्या वाढवण्यासाठी आता बसमधील प्रत्येक आसनाच्या मागे क्यूआर कोड लावण्याचा निर्णय घेतला आहे. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यावर प्रवाशांना पीएमपीचे ॲप डाऊनलोड करता येईल. पीएमपीचे नवे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी या नावीन्यपूर्ण उपक्रमाची माहिती दिली. प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर आणि हायटेक व्हावा, हा त्याचा उद्देश आहे.

**शून्यकचरा दिन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या  वतीने दापोडी इथल्या आनंदवन झिरो वेस्ट प्रकल्पात आंतरराष्ट्रीय शून्य कचरा दिन नाविन्यपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी पथनाट्याचं सादरीकरण करण्यात आलं. कचरा व्यवस्थापन, कचऱ्याचे चार प्रकारे विलगीकरण, एकल वापराच्या प्लास्टिकवरील बंदी, कापडी पिशव्यांचा वापर, 'आर.आर.आर. सेंटर'ची संकल्पना तसेच घरगुती कंपोस्टिंग अशा विषयांवर या पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली.

**क्रेसेंडो२०२६**

विद्यार्थ्यांनी करिअरच्या वाटचालीत खरेपणाचा  ध्यास धरण्याची गरज  प्रसिद्ध अभिनेते, लेखक,दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी व्यक्त केली. यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या  इंटरनॅशनल  इन्स्टिट्यूट  ऑफ मॅनेजमेंटच्यावतीनं आयोजित क्रेसेंडो २०२६  सांस्कृतिक  महोत्सवात  ते विद्यार्थ्यांशी संवाद  साधताना बोलत होते. करिअरच्या प्रवासात सध्या भेडसावणाऱ्या आव्हानांना सामोरं जात असतानाच भविष्यातील संभाव्य घटनांचा वेध घेऊन त्यादृष्टीनं आपलं व्यक्तिमत्व सज्ज ठेवण्याचे प्रयत्न करावेत असा सल्ला यांनी तरडे यांनी विद्यार्थ्यांना दिला

**रोटरी शोभा डे**

प्रसिद्ध लेखिका, स्तंभलेखिका शोभा डे यांनी साहित्य, पत्रकारिता आणि सार्वजनिक चर्चेत दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल रोटरी क्लब ऑफ पूना तर्फे त्यांचा विशेष मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. रोटरी प्रांतपाल संतोष मराठे यांच्या हस्ते शोभा डे यांना हे मानपत्र प्रदान करण्यात आलं. अध्यक्ष रोहित मित्रा , माजी प्रांतपाल डॉ दीपक शिकारपूर , विवेक अरान्हा , माजी अध्यक्ष कैलास मोंगा यावेळी उपस्थित होते. आपल्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करत समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींना हे मानपत्र प्रदान केलं जातं.

**महापौर सत्कार**

महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या सुशोभिकरणासाठी महापालिकेनं अर्थसंकल्पात एक कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल या संस्थेच्या वतीनं महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, आयुक्त नवल किशोर राम यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. येत्या शुक्रवारी, ३ एप्रिलला रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे ज्येष्ठ विचारवंत डॉक्टर श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात येणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 34 तर किमान तापमान 19 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. बहुतांश ठिकाणी आकाश दुपारनंतर अंशतः ढगाळ असून जोराचे वारे आणि विजांसह हलका पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.  उद्याही असंच हवामान राहण्याचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**